


दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**
धर्म म्हणजे मानवी अंत:करणाच्या विकासाचे फळ आहे. यास्तव धर्माचा, प्रमाणभूत आधार पुस्तक नसून मानवी अंत:करण आहे...
– स्वामी विवेकानंद

वर्ष : ०५ | अंक : ८५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.०८ नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# पार्थ पवारांवर गुन्हा दाखल का केला नाही? अजित पवारांनी सांगितलं कारण

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पत्रकार परिषद घेत पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने केलेल्या वादग्रस्त जमीन प्रकरणावर प्रतिक्रिया दिली. संबंधित जमीन व्यवहार रद्द करण्यात आल्याची माहिती अजित पवारांनी आपल्या पत्रकार परिषदेत दिली. यावेळी पार्थ पवार यांच्यावर गुन्हा दाखल का झाला नाही? याचं उत्तर दिलं आहे. या प्रकरणातील जे डॉक्यमेंट झाले होते ते सर्व कॅन्सल करण्यात आल्याचं अजित पवार पत्रकार परिषदेत म्हणाले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींच्या निमित्ताने आढावा बैठका घेतल्या होत्या. त्यावेळेस मी आढावा बैठका संपल्यानंतर गेल्या दोन दिवसांपूर्वी ज्या चर्चा सुरु आहेत त्याची पूर्ण माहिती घेऊन त्यावर बोलेन आणि माझी भूमिका स्पष्ट करेन, असं अजित पवार सुरुवातीला म्हणाले.

मी आजपर्यंतच्या माझ्या ३५ वर्षांच्या राजकीय जीवनात कधी नियम सोडून काम केलेलं नाही. मागे माझ्यावर २००९-२०१० मध्ये आरोप झाले. पण त्याचे कुठेही पुरावे निघाले नाहीत. त्याचे श्वेतपत्रिका निघाले आहेत. पण मधूनआधून त्यावरुन कमेंट करुन मला टार्गेट करण्याचा प्रयत्न केला जातो, असं अजित पवार म्हणाले.

या व्यवहारात एक रुपया देखील दिला गेला नाही. सर्व डॉक्यूमेंट्स कॅन्सल करण्यात आलेला आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती एक महिन्यात चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यांनी पारदर्शकपणे काम करावं. राज्याच्या प्रमुखांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. स्वच्छ अधिकारी तपास करत आहेत. मी राज्याचा उपमुख्यमंत्री असल्याने माझ्या सर्व अधिकाऱ्यांना सूचना करायच्या आहेत. इथून पुढे कुठेही माझं नाव घेऊन एखादं प्रकरण आलं आणि नियमाच्या बाहेर आलं तर अजिबात दबावात येऊन काम करु नये, असं आवाहन अजित पवार यांनी केलं आहे.



मीडियाला या गोष्टी मिळाल्या. ते मीडियाचं कामच आहे. पण त्यामध्ये अजून इतर बाबी आल्या. माझं म्हणणं आहे चुकीच्या गोष्टी झाल्या असतील त्या सगळ्यांची चौकशी संबंधित अधिकाऱ्यांनी करावी. मागच्या काळात कुठेही व्यवहार झाल्या असतील तर चौकशी करावी. मी अनियमित असा कोणताही व्यवहार करणार नाही, असं अजित पवार म्हणाले.

यामध्ये एकही पैशाचा व्यवहार झालेला नाही. तरीही रजिस्ट्रेशन कसं झालं, हा तपासाचा भाग आहे. या प्रकरणात दोन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस पोलिसांचं काम करणार आहेत. यामध्ये राजकीय हस्तक्षेप कुणी करणार नाही. या प्रकरणात सर्व माहिती समोर यायला हवी. कुणी कुणाची फसवणूक केली, कुणी सांगितल्यामुळे हे घडलं, कुणाचे फोन गेले, कुणी दबाव आणला होता, या सगळ्या गोष्टी चौकशी समितीच्या तपासात समोर येतील, असं ते म्हणाले.


मला हा व्यवहार झालेला माहिती नव्हता. ज्यावेळेस कुणी चर्चा करतं तेव्हीं मी सांगतो की, नियमाप्रमाणे करा. नियमाच्या बाहेर केलेलं मला चालत नाही. मी माझ्या ऑफिसमधील कर्मचाऱ्यांना विचारलं की, उपमुख्यमंत्री कार्यालयातून कुणी फोन करुन अधिकाऱ्यांवर दबाव टाकला का? ते नाही म्हणाले. रजिस्ट्रेशन कॅन्सल करण्यात आलं आहे. त्याचे काय कागदपत्रे दिले ते माहिती नाही. तिथे नोंदणी कार्यालयात जावून हे रद्द करण्याबाबतच्या घडामोडी झाल्याची माहिती मिळाली आहे, असं अजित पवारांनी सांगितलं.

### "पार्थ पवारांवर गुन्हा दाखल का झाला नाही?

ही जमीन सरकारी होती. सरकारी जमिनीचा व्यवहार होऊ शकत नाही. ही पूर्वीची महार वतनाची जमीन आहे. अशा अनेक प्रकारच्या गोष्टी पुढे आल्या आहेत. त्याच्याबाबत चौकशी केल्या जाणार आहेत. रजिस्ट्रेशन कुणी केलं याच्या चौकशी होतील. तीन लोकांवर गुन्ह्यात टाकलं गेलं आहे. काही लोकांनी विचारलं की, पार्थ पवार यांच्यावर गुन्हा का दाखल केला नाही? मला असं कळलं की महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं, जे ऑफिसला जावून सही करुन गेले त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे, असं अजित पवार यांनी स्पष्ट केलं.

या गोष्टीची इत्यंभूत माहिती लवकर समोर येईल. कारण काही जणांनी पाच-सहा लाख देवून जमिनीचा व्यवहार केली होती. याबाबत पार्थ आणि दिग्विजयला माहिती नव्हतं. एक महिन्यात सर्व पुढे येईल. त्यातून आपल्याला वस्तुस्थिती पुढे येईल. आता कुणी ना कुणी नवे प्रकरण काढतात. काहीही समोर आलं तर अधिकाऱ्यांनी निर्धास्तपणे सगळ्या प्रकरणांची चौकशी करावी, असं मत अजित पवारांनी मांडलं.

# झोपेत असतानाच घातले कुऱ्हाडीचे घाव
## जन्मदात्या आईबापाला संपवलं




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, बुलडाणा :** ज्यांनी लहानाचे मोठे केले, आपला जीव ओवाळून टाकला, त्याच जन्मदात्या आईवडिलांची मुलाने झोपेत असताना कुऱ्हाडीने घाव घालून हत्या केली. त्यानंतर स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केली. ही भयंकर आणि तितकीच हृदय हेलावून टाकणारी घटना चिखली तालुक्यातील सावरगाव डुकरे येथे बुधवारी रात्री घडली.

गुरुवारी सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर बुलढाणा जिल्हा हादरला आहे. सुभाष डिगांबर डुकरे (६०) व लताबाई सुभाष डुकरे (५५) असे हत्या करण्यात आलेल्यांची नावे आहेत. तर विशाल सुभाष डुकरे (३५) या मारेकरी मुलाने आईवडिलांना ठार मारल्यानंतर आत्महत्या केली. दारूच्या आहारी गेलेल्या विशालने क्रूरकृत्य केल्याने जिल्हाभर संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, तिघांच्याही मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. सावरगाव डुकरे हे एक आदर्श गाव आहे.

सुभाष हे शेतकरी होते. त्यांना शरद व विशाल ही दोन मुले आहेत. दोघांचेही लग्न झाले आहे. यातील विशाल याला दारूचे व्यसन जडले होते. शरद विवाहानंतर आईवडिलांपासून वेगळा राहतो. तो कृषी केंद्र चालवतो. ६ नोव्हेंबरला रात्री विशाल दारू पिऊन घरी गेला. आई आणि वडील दोघेही गाढ झोपेत होते. निद्रिस्त अवस्थेतच मुलगा विशाल याने डोक्यावर आणि मानेवर धारदार कुऱ्हाडीने वार करून आईबापाला संपविले. त्यांचे घर मुख्य रस्त्यापासून काही अंतरावर असल्याने ओरडण्याचा आवाज कुणालाच आला नाही.

**▶ आजोबा दार उघडत नाही, नातवंडे ओरडली**

गावात अंत्यविधीचा कार्यक्रम असल्याने सर्व गावकरी तेथे गेलेले होते. गुरुवारी सकाळी मोठा मुलगा शरद डुकरे हे कृषी केंद्रात बसलेले होते. आजोबा घर उघडत नाहीत म्हणून त्यांची मुले धावत आल्यानंतर ही घटना उघडकीस आली. दरवाजा आतून बंद होता. ग्रामस्थांनी खिडकी तोडून आत प्रवेश केला असता सुभाष आणि लताबाई हे रक्ताच्या थारोळ्यात पडलेले व विशालचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आला. कंटाळून पत्नी गेली सोडून विशालच्या दारूच्या व्यसनाला कंटाळून पत्नी काही वर्षांपूर्वी सोडून गेली होती. भाऊसुद्धा त्याच्यापासून विभक्त राहू लागला. मुलासाठी आई, वडील काळजी करायचे. परंतु त्यांचेच हत्याकांड मुलाने घडविले.

**▶ व्यवसाधीनतेने संपविले कुटुंब !**

विशाल एवढा व्यसनाधीन झाला होता की, तो कुणालाही दारूसाठी पैसे मागायचा. अनेकांकडे तगादा लावायचा. घरातील हाती लागेल ती वस्तू, धान्य विकून दारू प्यायचा. यामुळे कुटुंबीय वैतागले होते. घरचे शेतमाल विकण्याला विरोध करीत असल्याचा राग त्याच्या मनात होता. त्याच्या व्यसनाधीनतेमुळे तिघांचे बळी गेल्याचे गावकरी बोलत आहेत

# बल्लारपुरातील गुंडांच्या टोळीवर मोक्का ! १० कुख्यात गुन्हेगारांविरोधात कारवाई

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** बल्लारपूर येथील कुख्यात गुंडांची चोरी ही चंद्रेश उर्फ छोटु देसराज सुर्यवंशी व येदुराज उर्फ बच्ची रामनरेश आरक याचे नेतृत्वात जिल्ह्यातील गुन्हेगारीविश्वात वर्चस्व निर्माण करण्यासाठी मागील काही वर्षापासून चंद्कपूर जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन हद्दीत खून, दरोडे, बंदुका विक्री असे गुन्हे घडवून आणले जात होते. चंद्रपुरात चार बंदुका विक्रीसाठी आणले असता आरोपींना पकडण्यात आले. त्यातून हा कट उघडकीस येताच जिल्हा पोलीस प्रशासनाने या १० जणांच्या गुंडांच्या टोळीवर मोक्काअंतर्गत कारवाई केली आहे.

या टोळीतील गुंडांवर जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन हद्दीत सार्वजनिक ठिकाणी अग्निशस्त्राचा वापर करुन, खुनाचा प्रयत्न, गंभीर दुखापत, खंडणी, शासकीय कामात अडथळा, मालमत्तेचे नुकसान करुन सर्व सामान्य जनतेत दहशत निर्माण करणाऱ्या अनेक गुन्ह्यांची नोंद आहे. बल्लारपूर येथील कुख्यात गुंडांची टोळीतील प्रमुख नामे चंद्रेश उर्फ छोटू देसराज सुर्यवंशी, येदुराज उर्फ बच्ची रामनरेश आरक व त्याचे इतर साथीदारांनी संयुक्तरित्या केलेल्या गुन्ह्यातील




सदस्यांविरुध्द पोस्टे चंद्रपूर शहर येथील दाखल गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ ची कलम लावण्यात आलेली आहे.

नुकतेच पोलीस स्टेशन चंद्रपूर शहर हद्दीत २० ऑक्टोबर २०२५ रोजी सदर गुंडांच्या टोळीला गंजवार्ड चंद्रपूर येथे २ माऊझर गन (पिस्टल), २ देशी कट्टे, ३५ नग जिवंत काडतुस तसेच ४ लोखंडी धारदार खंजर असे घातक हत्यारासह दरोडा टाकण्याचे बेतात असताना पोलिसांनी धाड टाकून पकडले होते. सदर गुन्ह्याचे तपासात, सदर टोळी ही दरोडा टाकून प्राप्त पैशातून खुनासारखा गंभीर गुन्हा करण्याचे तयारीत असल्याचे निष्पन्न झाले असून, पोलिसांच्या सतर्कतेने खुनाच्या गुन्ह्यास प्रतिबंध करण्यास यश आले आहे.

हे गुन्हे या टोळीने स्वत:चे आर्छिक फायदा करण्याकरीता, वर्चस्व व दहशत निर्माण करण्याकरीता केलेले असून अद्यापही ते संघटित पध्दतीने गुन्हेगारी कारवाया सातत्याने करीत असल्याने सदर टोळीवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम समाविष्ट होणेबाबतचा आवश्यक प्रस्ताव पाठवून सदर टोळीतील चंद्रेश उर्फ छोटू देसराज सुर्यवंशी (२३), येदुराज उर्फ बच्ची रामनरेश आरक (२७), मुकेश राजु वर्मा (२०), अमित बालकृष्ण सोनकर (२६), गौरिश श्रीनिवास कुसमा (१९), अनवर अब्बास शेख (२३), इतर साथीदार गुन्हेगारांविरुध्द महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ ची कलम लावण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपूर प्रमोद चौगुले यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे चंद्रपूर शहर चे ठाणेदार पोलीस निरीक्षक निशीकांत रामटेके, आणि स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूरचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे, पोउपनि संतोष निंभोरकर, सफौ अरुण खारकर व पोअं गजानन नन्नावारे व मोक्का पथकाने केलेली आहे.

## ५ हजार ४५९ पोलिसांना मिळणार हक्काचे घर !
# दोन वर्षांपासून प्रलंबित डीजी लोनला १७६८ कोटींची मंजुरी...

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. मुनगंटीवार यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे राज्यातील ५ हजार ४५९ पोलीस अंमलदारांच्या हक्काच्या घराचा प्रश्न सुटला आहे. त्यासाठी राज्यभरातील पोलिसांनी आ. मुनगंटीवार यांचे आभार मानले आहेत. तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिसांच्या हक्काच्या घराचा प्रश्न संवेदनशीलतेने सोडविल्याबद्दल आ. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे आभार मानले आहेत. शासनाकडून मिळणाऱ्या डीजी लोन (पोलीस गृहबांधणी अग्रीम) योजनेपासून राज्यातील ५ हजार ४५९ पोलीस अंमलदार दोन वर्षापासून वंचित होते. यासंदर्भातील माहिती मिळताच आ. सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून शासनाने डीजीलोन करीता १७६८.०८



कोटी रुपयांच्या निधीला मंजूरी दिली. याबाबतचे आदेश गृहविभागाचे उपसचिवांनी काढले. महाराष्ट्र पोलिस दलासाठी डीजी गृह कर्ज योजना अत्यंत महत्त्वाची आहे. यामुळे अंमलदार यांना घर बांधण्यासाठी थेट पोलिस गृहविभागाकडून मूळ वेतनाच्या १२५ टक्के कर्ज मिळते. ज्या अधिकारी व अंमलदारांकडे स्वतःचे निवासस्थान नाही. अशा कर्मचाऱ्यांना त्यांचे स्वतःचे हक्काचे घर मिळावे या करीता ही योजना राबविली जाते. ऑगस्ट २०२३ पासून आजपर्यंत राज्यातील जवळपास पाच हजार ४५९ अंमलदारांनी डीजी लोन करीता अर्ज दाखल केले होते. परंतु दोन वर्षात शासनाकडून योजनेतील एकाही अंमदाराचा अर्ज मंजूर करण्यात आलेला नव्हता. डीजी लोन करीता शासनाकडे राज्यभरातून सुमारे ४ हजार ७११ आणि मुंबईतून ७४८ इतके अर्ज दाखल केले आहे. हे संपूर्ण अर्ज ऑनलाईन पद्धतीने शासनाकडे सादर कले आहेत. यामध्ये ४ हजार ७११ अर्जाकरीता १२५५ कोटी ८७ लाख रुपयांची तर बृहन्मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयातंर्गत ७४८ प्रलंबित अजौरणठी २१२ कोटी २० लाख रुपयांची आवश्यकता होती.

**▶ संवेदनशील, तत्पर अन् पाठपुरावा !**


गृहकर्जासाठी (डिजी लोन) गेल्या दोन वर्षांपासून पोलीस अंमलदार शासनदरबारी पाठपुरावा करीत होते. पोलीस स्वतःच्या हक्काच्या घरापासून वंचित असल्याचा मुद्दा आ. मुनगंटीवार यांनी गांभीर्याने घेतला. पाठपुरावा करीत विधानसभेत हा मुद्दा मांडून शासनाचे लक्ष वेधून घेतले. अखेर शासनाने डीजीलोन करीता १७६७,०८ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली. आ. मुनगंटीवार यांची संवेदनशीलता, तत्परता आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा याचेच हे यश असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# संपादकीय

## 'डिजिटल अरेस्ट'

पूर्वी दरोडेखोर घरांवर दरोडा टाकून घरातील मौल्यवान वस्तू आणि रोख रक्कम लुबाडून नेत असत पण आज काळ बदलला आजचे युग हे डिजिटल युग आहे आणि या डिजिटल युगात दरोड्याची पद्धतही बदलली. दरोडेखोरही डिजिटल झाले आणि दरोड्याची पद्धत डिजिटल झाली. आज दरोडेखोर तंत्रज्ञानाचा वापर करून लोकांची लुबाडणूक करतात त्यालाच सायबर गुन्हा असे म्हणतात. सायबर गुन्हेगार नागरिकांना तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना लुबाडण्याचा नवा नवा फंडा शोधत असतात कधी ते क्रेडिट कार्डची माहिती विचारून तर कधी बँक खात्याची माहिती विचारून अवघ्या काही सेकंदात नागरिकांचा बँक बॅलन्स शून्य करतात. जेंव्हा खात्यातून पैसे गायब होतात तेंव्हाच नागरिकांना आपली लुबाडणूक झाली हे लक्षात येते मात्र तोवर खूप उशीर झालेला असतो. सायबर गुन्हेगार फसवणूक झालेल्या नागरिकांचा बँक बॅलन्स शून्य करतात बरे हे सायबर गुन्हेगार शोधणे हे पोलिसांसाठीही मोठे जिकिरीचे काम असते कारण हे गुन्हेगार अदृश्य चेहऱ्याचे असतात. हे सायबर गुन्ह्याचे नवेनवे फंडे शोधून काढत असतात असाच ' डिजिटल अरेस्ट' हा नवा फंडा सायबर गुन्हेगारांनी शोधून काढला आहे. सध्या डिजिटल अरेस्टच्या नावे फसवणूक आणि लुटीचा सुळसुळाट सुरू आहे. डिजिटल अरेस्टद्वारे फसवणूक झाल्याचा प्रकार सध्या रोजच घडत आहे. यात सायबर गुन्हेगार जेष्ठ नागरिकांना लक्ष करतात आणि त्यांना डिजिटल अरेस्टची भीती घालून त्यांच्याकडून लाखोंची, करोडोंची लूट करतात. असाच प्रकार काही दिवसांपूर्वी पुण्यात घडला. डिजिटल अरेस्टची भीती दाखवून सायबर गुन्हेगारांनी ८३ वयाच्या निवृत्त सरकारी अधिकाऱ्याला तब्बल १ कोटी २० लाखांना गंडा घातला. याचा प्रचंड मानसिक त्रास झाल्याने त्या व्यक्तीचा मृत्यू झाला. याआधी हरियाणातही एका वृद्ध दांपत्याला अशाच प्रकारे डिजिटल अरेस्टची भीती दाखवून एक कोटी रुपयांना लुबाडले. डिजिटल अरेस्ट करताना सायबर गुन्हेगार श्रीमंत असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना लक्ष करतात. सायबर गुन्हेगार जेष्ठ नागरिकांना व्हिडिओ कॉल करून आपण पोलिस, ईडी, सिआयडी, सीबीआय, प्राप्तिकर विभाग, लष्करी अधिकारी असल्याची बतावणी करतात. देशविघातक कृत्य, बेकायदेशीर वस्तू, ड्रग्स, बनावट पासपोर्ट, दहशतवाद्यांशी संबंध असल्याचे सांगून जेष्ठ नागरिकांना डिजिटल अरेस्ट केल्याचे संगीतात. पीडितांना विश्वास बसावा यासाठी ते न्यायालयाचे बनावट आदेशही पाठवतात. सायबर गुन्हेगार पीडित व्यक्तीला २४ तास त्यांच्या घरातच व्हिडिओ कॉलवर बंदिस्त अर्थात नजर कैदेत ठेवतात. सायबर गुन्हेगार व्हिडिओ कॉलवर कुठल्या तरी पोलिस स्टेशन किंवा सीबीआयच्या कार्यालयातून बोलत असल्याचे भासवतात. त्यामुळे पीडित व्यक्तीला त्यांच्यावर विश्वास बसतो. पीडित व्यक्ती आपण खरेच डिजिटल अरेस्ट झाल्याचे मानतो आणि तुरुंगात जावे लागू नये म्हणून सायबर गुन्हेगार मागतील तेवढी खंडणी त्याला देण्यास तयार होतात. सायबर गुन्हेगार ही खंडणी ऑनलाईन वसूल करतात. अवघ्या काही तासात सायबर गुन्हेगार या जेष्ठ नागरिकांकडून लाखो करोडो रुपये लुबाडतात. सायबर गुन्हेगारांनी डिजिटल अरेस्ट हा नवा फंडा वापरून यावर्षी जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यात तब्बल ११२ कोटी रुपये लुबाडल्याचे समोर आले आहे. या आठ महिन्यात डिजिटल अरेस्टचे तब्बल २०८ गुन्हे नोंदवले गेले आहेत. या आकडेवारी वरुनच याची व्याप्ती किती मोठी आहे हे आपल्या लक्षात येईल. डिजिटल अरेस्टचे गुन्हेगार शोधणे सायबर पोलिसांसाठी मोठी डोकेदुखी बनली आहे कारण हे सर्व गुन्हेगार अदृश्य चेहऱ्याचे असतात आणोबते गुन्हा देखील आभासी पद्धतीने करतात. सायबर गुन्हेगार देशातील कोणत्याही भागातून किंवा अगदी परदेशातूनही हा गुन्हा करतात त्यामुळे त्यांना शोधणे पोलिसांना सहज शक्य होत नाही. सायबर पोलिस या गुन्हेगारांना शोधण्याचा सर्वो तोपरी प्रयत्न करत असतातच मात्र नागरिकांनीही याबाबत सतर्क राहायला हवे. भारतीय कायद्यात कोठेही डिजिटल अरेस्टला थारा नाही. आपल्या कायद्यानुसार डिजिटल अरेस्टला कोणतीही मान्यता नाही याची नोंद नागरिकांनी घ्यायला हवी. पोलिस किंवा कोणतीही सरकारी यंत्रणा आपल्याला डिजिटल अरेस्ट करू शकत नाही. मात्र हे खूप कमी लोकांना माहीत आहे म्हणूनच याबाबत जनजागृती व्हायला हवी. नागरिकांना विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना याबाबत माहिती द्यायला हवी. डिजिटल अरेस्ट किंवा एकूणच सायबर गुन्ह्याविषयी शाळा महाविद्यालयात कार्यशाळा, प्रत्यक्षिके, प्रशिक्षणे, जनजागृती कार्यक्रम आणि प्रचार प्रसार करायला हवा. प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मिडियातूनही याबाबत जनजागृती व्हायला हवी. नागरिकांनीही याबाबत सतर्क राहायला हवे. नागरिक सतर्क राहिले तरच सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात अडकणार नाही.

# पुस्तका एवढा चांगला मित्र कोण आहे?



प्रत्येकाच्या जीवनात मित्रपरिवार हा असतोच. ज्यांच्या जीवनात मित्र नाहीत असा माणूस या पृथ्वीतलावर क्वचितच असेल. म्हणजे प्रत्येकाच्या जीवनात मित्र असणे हे साहजिक आहे. परंतु प्रत्येकाचेच मित्र हे चांगले असतात असे नाही. काही जणांचे मित्र कपटी असतात, काही जणांचे मित्र लबाड व ढोंगी असतात तर काही जणांचे मित्र स्वार्थी व कावेबाज असतात. मग अशा स्वार्थी, कपटी, ढोंगी व लबाड मित्रांना मित्र तरी कसे म्हणावे? जो मित्र आपल्या सोबत जीवाला जीव देऊन राहतो, संकटात व वाईट काळात साथ देतो, आपल्या सुखदुःखात सामील होतो आणि आर्थिक संकटात मदत करतो तोच खरा मित्र असतो.

परंतु हल्ली असे प्रामाणिक व इमानदार मित्र दुर्मिळ झाली आहेत. आणि वाईट मित्रांचा सुळसुळाट वाढला आहे. म्हणून या जमान्यात मित्र बनवणे आणि मित्रांसोबत राहणे अवघड झाले आहे. आजकालचे मित्र कधी धोका देतील आणि कधी पाठीत खंजीर खुपसतील याचा काही नेम नाही. म्हणून अशा स्वार्थी, कावेबाज व ढोंगी मित्रांच्या दुनियेत पुस्तकांसोबत मैत्री करणे काळाची गरज बनली आहे. जशी माणसे कपटी, धूर्त, स्वार्थी व लबाड असतात, तशी कपटी, धूर्त व स्वार्थी पुस्तके नसतात. म्हणून आपण पुस्तकांसोबत निखळ मैत्री केली पाहिजे. नेहमी पुस्तकांच्या सहवासात राहिले पाहिजे. निरंतर पुस्तकांचे वाचन केले पाहिजे.

कारण 'पुस्तकांसारखा मित्र नाही आणि ग्रंथासारखा गुरु नाही' हे काय उगीच म्हटले नाही. आजकाल मित्रांकडून काय घ्यावे आणि मित्र आपल्याला काय देईल? याचा काही भरवसा नाही. कारण आजकालचे मित्र व्यसनाने पुरते बरबटून गेले आहेत. दारू, गांजा व सिगारेट पिऊन स्वतःच्या जीवनाला वाईट वळणावर नेत आहेत. म्हणजे अशा वाईट व व्यसनी मित्रांच्या सहवासात राहिल्याने आपण सुद्धा व्यसनी म्हणून ओळखले जातो. कारण आपण ज्याच्या सहवासात राहतो त्याची जरा तरी सावली आपल्या अंगावर पडते. म्हणून वाईट मित्रांच्या सावलीत राहायचे का पुस्तकांच्या सहवासात राहायचे हे प्रत्येकाने ठरवायला हवे.

पुस्तकांच्या सहवासात राहिल्याने आपण ज्ञानी, गुणी व बुद्धिमान म्हणून ओळखले जातो. पुस्तकाच्या वाचनाने माणसाचे मस्तक सुधारते आणि सुधारलेले मस्तक हे कोणापुढेही नतमस्तक होत नसते म्हणून नेहमी आपल्या मस्तकाला पुस्तकात घालायचे असते हा सुविचार प्रत्येकाने लक्षात ठेवायला हवा. आपल्याला एक वेळ जवळचे मित्र व नातेवाईक धोका देतील पण पुस्तके कधीच धोका देणार नाहीत. पुस्तका एवढा इमानदार मित्र या पृथ्वीतलावर शोधूनही सापडणार नाही. कोणतेच पुस्तक हे वाईट नसते.

कोणत्याही लेखकाने लिहिलेले पुस्तक हे सकारात्मक दृष्टिकोन ठेवूनच लिहिलेले असते. कोणताच लेखक पुस्तक वाईट लिहीत नसतो. म्हणून एकदा प्रकाशित झालेले पुस्तक हे माणसाला दिशादर्शक ठरत असते.

मोबाईलच्या जमान्यात पुस्तकांचे वाचन कमी झाले आहे. माणूस गुगलवर माहिती मिळवत आहे. परंतु गुगलवर जी माहिती मिळते ती माहिती सखोल व परिपूर्ण नसते. परंतु पुस्तक रूपात लिहिलेली माहिती ही परिपूर्ण व सकारात्मक असते. म्हणून गुगलवर माहिती मिळवण्यापेक्षा पुस्तकांचे वाचन करा तुम्हाला आपोआप सखोल माहिती मिळून जाईल. माणसाने दररोज पुस्तकाची किमान ३० तरी पाने वाचली पाहिजेत. माणसाकडे जसा मोबाईल आला तेव्हापासून ग्रंथालयात जाऊन पुस्तके वाचणे लोकांनी बंद केले आहे.

आता पेपर सुद्धा मोबाईलवर ऑनलाइन वाचायला मिळत आहेत. परंतु मोबाईलवर वाचन करण्यापेक्षा पुस्तकात वाचन करण्यात जो आनंद आहे तो अवर्णनीय असतो. म्हणून माणसाने पुस्तकांना वाचणे काळाची गरज आहे. पुस्तकांच्या वाचनाने माणसाच्या बुद्धीच्या कक्षा रुंदावत जातात. माणसाला चांगल्या वाईटाची जाण येते. माणसाची वैचारिक पातळी वाढते. स्मरणशक्ती सुद्धा सुधारते आणि बुद्धी प्रगल्भ व सक्षम होते.

पुस्तके वाचल्यावर माणसाला ताजेतवाने झाल्यासारखे वाटते. केवळ पुस्तकांच्या बळावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर भारतीय घटनेचे शिल्पकार व आधुनिक भारताचे राष्ट्र निर्माण झाले.

एवढेच नव्हे तर संपूर्ण जग त्यांना सिम्बॉल ऑफ नॉलेज म्हणून ओळखते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्ञानाचे इतके भुकेले होते की त्यांनी पुस्तकांसाठी मुंबईला राजगृह बांधले. पुस्तकांवर जिवापाड प्रेम करणारे एकमेव महामानव म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते. या जगात माणसाला मोठं व्हायचं असेल तर पुस्तकांच्या सहवासात राहायला हवे.

या जगात जेवढे कोणी महान विचारवंत, तत्त्ववेते व गाढे अभ्यासक होऊन गेलेत त्यांनी केवळ पुस्तकांचे वाचन करून आकाशाला गवसणी घातली आहे.

म्हणून आजकालच्या तरुणाईला विनंती आहे की, बांधवांनो रानटी जनावराप्रमाणे कुठेही उधळत फिरण्यापेक्षा पुस्तकांचे वाचन करा... चांगली व नामांकित गाजलेली पुस्तके वाचनासाठी खरेदी करा... नामांकित लेखकांचे साहित्य वाचा... अण्णाभाऊ साठे, ना.सी.फडके, वि.स.खांडेकर, शंकरराव खरात, विश्वास पाटील, साने गुरुजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, उत्तम कांबळे आणि शरण कुमार लिंबाळे या महान साहित्यिकांचे साहित्य वाचून आपल्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून आणावा...पुन्हा तुम्हालाच आपोआप कळेल की, पुस्तकांसारखा खरा मित्र दुसरा कोणी नाही... ग्रंथ हेच खरे मित्र आहेत.

**– बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## हो जागा..

निवडणूका जाहीर
चलारे कामा लागा
युध्द होणारं तुंबळ
कुणा कुठली जागा

गठ बंधन करताना
दिल्या शब्दां जागा
नेहमी ना अपेक्षित
व्यवहार मनाजोगा

सरली विश्रांतीवेळ
जरा सतर्कते जागा
प्रत्येक मता महत्व
विनय शीलते मागा

उचकावू दे प्रतिपक्ष
शांत संयमाने वागा
आमंत्रण घातपाता
नियंत्रण ठेवावे वेगा

पथयात्रा रोज काढे
पडू द्या पायांसभेगा
सध्या कष्ट घ्यायचे
मग राजसुख भोगा

प्रति पक्षी प्रभागात
मातवूनि टाका दंगा
अस्वस्थहवे मतदार
कुणी न घ्यावा पंगा

जन संपर्क साधावा
तवसेवा संधी दे गा
आश्वासनांचीपूर्तता
कधी ना द्यावा दगा

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वृत्त, अचूक बातमी

# भारतासाठी गुड न्यूज, जखमी प्रतिका रावलला अखेर न्याय मिळाला...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, नवी दिल्ली :** भारताने वर्ल्ड कप जिंकला. भारताच्या सर्व खेळाडूंनी जोरदार सेलिब्रेशन केला. पण या सेलिब्रेशनधली एक गोष्ट भारतीयांच्या मनाला बोचत राहीली होती. कारण वर्ल्ड कपमध्ये भारताला जी खेळाडू दमदार सुरुवात करून देत होती, तिच्यावर मात्र अन्याय झाला होता. पण अखेर भारताची सलामीवीर प्रतिका रावलला अखेर न्याय मिळाला आहे. कारण आता वर्ल्ड कप संपल्यावर भारतीयांसाठी एक आनंदाची बातमी आली आहे.



भारत आणि बांगलादेश यांच्या वर्ल्ड कपमधला सामना सुरु होता. या सामन्यात प्रतिकाला गंभार दुखापत झाली. प्रतिका यावेळी चालूही शकत नव्हती. घोट्याच्या दुखापतीमुळे प्रतिकाला स्पर्धेच्या अंतिम टप्प्यातून बाहेर पडावे लागले. प्रतिकाच्या जागी शेफाली वमर्ची निवड करण्यात आली, जिच्या अष्टपैलू कामगिरीमुळे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या अंतिम सामन्यात भारताने नवी मुंबईतील डीवाय पाटील स्टेडियमवर ५२ धावांनी विजय मिळवला आणि ट्रॉफी जिंकली. पण भारताने वर्ल्ड कप जिंकल्यावरही प्रतिकावर अन्याय झाल्याचे समोर आले आहे.

वर्ल्ड कप जिंकल्यावर सर्व खेळाडू सेलिब्रेशन करत होते, पण स्मृती मानधना यावेळी प्रतिकाला विसरली नाही. प्रतिका दुखापतीमुळे व्हिलचेअरवर होती, पण तरीही तिला स्मृती मानधनाने मैदानात आणले होते. त्यानंतर भारताच्या सर्व खेळाडूंना विजेतेपदाची मेडल्स देण्यात आली. पण प्रतिला रावलला मात्र यावेळी मेडल मिळाले नाही. त्यावेळी चाहत्यांना प्रतिकावर अन्याय झाला असे वाटत होते. पण नियमानुसार संघातील १५ खेळाडूंनाच मेडल्स मिळत असतात. दुखापतीमुळे प्रतिकाला १५ सदस्यीय संघामधून बाहेर केले होते, पण तिने संघासाठी भरीव योगदानही दिले होते हे सर्वांनाच मान्य होते. पण यावर अखेर तोडगा निघाला आहे आणि आयसीसीने आता एक मोठा निर्णय घेतला आहे. आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांच्या हस्तक्षेपानंतर प्रतीका रावलला शुक्रवारी विश्वचषक विजेत्याचे पदक मिळाले आहे. त्यामुळे प्रतिकाला यावेळी न्याय मिळाला, अशी भावना चाहत्यांच्या मनात आहे. प्रतिका यानंतर म्हणाली की, आता माझ्याकडे माझे स्वतःचे पदक आहे. मला वर्ल्ड कपचे पदक मिळाले आहे.

खरंतर, जय शहा सरांनी आयसीसीला माझ्यासाठी देखील पदक पाठवण्याची विनंती केली होती. त्यामुळे आता माझ्याकडे माझे स्वतःचे पदक आहे, त्यांचे आभार. माझ्या सपोर्ट स्टाफचे आणि आमच्या संपूर्ण टीमचे आभार. मी या संघाचा भाग असल्याने त्यांनी माझ्यासाठी पदकाची व्यवस्था केली आहे आणि आता अखेर माझ्याकडे पदक आहे. प्रतिका रावलला गंभीर दुखापत झाली होती आणि त्याच्या दुखापतीवर आयसीसीने फुंकर घातली आहे, असे आता म्हटले जात आहे. कारण तिलाही आता वर्ल्ड कपचे मेडल मिळाले आहे.

# टीईटी परीक्षेबद्दल मोठी बातमी!

शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) संदर्भात समाजमाध्यमांवरील चुकीच्या, दिशाभूत करणाऱ्या अफवांवर परीक्षार्थींनी विश्वास ठेवू नये, असे आवाहन करणारे निवेदन राज्य परीक्षा परिषदेने गुरुवारी काढले. समाजमाध्यमांद्वारे परीक्षा आयोजनाबाबत विविध तर्कवितर्क लावले जात असल्याने विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण होत होता.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे 'टीईटी' घेण्यात येते. २३ नोव्हेंबर रोजी परीक्षा होणार आहे. परीक्षेबाबत समाजमाध्यमातून चुकीच्या, दिशाभूल करणाऱ्या बातम्या, अफवा पसरविल्या जात असल्याचे परिषदेने म्हटले आहे. अशा अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना व माहितीचे अवलोकन करावे, असे परिषदेने स्पष्ट केले आहे. समाजमाध्यमातील चर्चेमुळे परीक्षार्थी विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याचे सांगण्यात येते. त्यानंतर परिषदेकडून आवाहन करणारे निवेदन देण्यात आले. परिषदेने म्हटले आहे. परीक्षेचे आयोजनाची कार्यवाही सुरू आहे. परीक्षेसंबंधित कार्यवाहीबाबत वेळोवेळी परिषदेच्या संकेतस्थळावर अधिकृत माहिती देण्यात येते. अफवांवर विश्वास ठेवू नये. अफवांवर विश्वास ठेवून झालेल्या नुकसानीस उमेदवार, विद्यार्थी सर्वस्वी जबाबदार असतील असेही परिषदेने स्पष्ट केले आहे.

परिषदेतर्फे २३ नोव्हेंबर रोजी 'टीईटी' घेण्यात येणार आहे. परीक्षेसाठी परीक्षा केंद्र निश्चिती, विद्यार्थ्यांसाठी बैठक व्यवस्था, सर्व परीक्षा केंद्रांवर परीक्षार्थींना पुरेशा सुविधा उपलब्ध करून देणे, आवश्यक सुरक्षा व अन्य व्यवस्थांबाबत सज्जता यासाठी प्रशासकीय पातळीवरून तयारी सुरू आहे. परीक्षेसाठी राज्यभरात चार लाख ७५ हजार ६६८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### पेणच्या न.पा मैदानावर हजारो विद्यार्थ्यांनी गायले 'वंदे मातरम' गीत

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०७, पेण (रायगड) :** भारत देशाच्या राष्ट्रीय गीताला १५० वर्ष पूर्ण झाल्यानेपेण शहरातील नगर पालिकेच्या मैदानावर राष्ट्रीय गीत वंदे मातरम सामूहिकरित्या हजारो विदयार्थ्यांनी, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय कार्यकर्ते, यांच्या उपस्थितीत शुक्रवार, दिनांक ०७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी म्हणण्यात आले. यावेळी खासदार धैर्यशील पाटील, तहसीलदार पेण तानाजी शेजाळ, आदिवासी विभागाचे सहआयुक्त तेजस्विनी गलांडे, पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल, राजू पिचिका, महेश बीऱ्हाडे, लक्ष्मी शालिनी विद्यालय प्राध्यापक, ओद्योगिक कॉलेजचे प्राचार्य सदाशिव पाटील, यासंह माजी नगराध्यक्ष प्रीतम पाटील, वैशाली कडू, कॉग्रेस नेत्या नंदा म्हात्रे, जी.प.सदस्य प्रभाकर म्हात्रे, डी.बी. पाटील, अनिरुद्ध पाटील, शोमर पेणकर, यासंह पेण शहरातील विविध शाळांतील विद्यार्थी विद्यार्थ्यांनी शिक्षक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्राध्यापक महेश बिऱ्हाडे यांनी वंदे मातरम या राष्ट्रीय गीताबद्दल रचना निर्मिती, बद्दल आपले विचार व्यक्त केले. या कर्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष टेंबे यांनी तर तबलावादन बल्लाळ ढवळे, आठवले यांनी केले.

### लोकनेते दत्ताजी पाटील विद्यालयातील एनसीसी विद्यार्थ्याची राष्ट्रीय कॅम्पसाठी निवड



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०७, विंचूर (नाशिक) :** लासलगाव शिक्षण सहाय्यक मंडळ संचलित लोकनेते दत्ताजी पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय या विद्यालयातील एनसीसी विभागातील विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्तरावरील ऑल इंडिया रॉक क्लाइंबिंग ट्रेनिंग कॅम्प या शिबिरासाठी निवड झाली आहे. दि.०८ नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर २०२५ दरम्यान ग्वाल्हेर (मध्य प्रदेश) येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरासाठी विद्यालयातील कॅडेट प्रदीप कैलास कुटे यांची निवड सेव्हन महाराष्ट्र बटालियन एनसीसी, नाशिक मधून झाली आहे. सदर कॅम्पमध्ये देशभरातील विविध राज्यांमधील विद्यार्थी सहभागी होणार आहेत. या यशाबद्दल सेव्हन महाराष्ट्र बटालियन एनसीसी चे कमांडिंग ऑफिसर एम. एस. केरूला आणि ऍडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर तनिष्क गौर, तसेच संस्थेच्या संचालिका नीताताई पाटील, विद्यालयाचे प्राचार्य विजय वाणी, क्रिडा शिक्षक व एनसीसी ऑफिसर प्रमोद पवार यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या यशस्वी निवडीबद्दल लासलगाव शिक्षण सहाय्यक मंडळाचे अध्यक्ष नानासाहेब पाटील, सचिव संजय पाटील, उपाध्यक्ष निवृत्ती गायकर, संचालिका नीताताई पाटील, पुष्पाताई दरेकर, संचालक शंतनू पाटील, अभय पाटील, सिताराम जगताप, लक्ष्मण मापारी, कैलास ठोंबरे, विद्यालयाचे प्राचार्य विजय वाणी, सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कॅडेट प्रदीप कुटे यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले. याप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या यशामागे विद्यालयाचे एनसीसी विभाग प्रमुख प्रमोद पवार व क्रीडा शिक्षक यांचे मार्गदर्शन लाभले.

### पनवेल मनपातर्फे बांबू लागवडीस सुरूवात



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०७, पनवेल :** पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. पनवेल महानगरपालिकेच्या उद्यान विभागाकडून २ हजार बांबू लागवड करण्यात येणार आहे. उपायुक्त (उद्यान) नानासाहेब कामठे यांच्यामार्फत प्रतिकात्मक काही बांबू झाडांचे रोपण करून या वृक्षारोपण कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. महाराष्ट्र बांबू धोरण २०२५, राष्ट्रीय बांबू मिशन (एनबीएम) तसेच महानगरपालिकेतर्फे विविध वृक्षांचे वृक्षारोपण अंतर्गत कळंबोली एन्ट्री पॉईंट (शिवसेना शाखा) ते केएलई कॉलेज पर्यंत मुख्य रस्त्याच्या बाजूला २००० बांबूची लागवड करणे नियोजित आहे. अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा कार्यक्रम पनवेल महानगरपालिका उद्यान विभागामार्फत सुरू आहे. प्रतिकात्मक काही बांबू झाडांचे रोपण करून या वृक्षारोपण कार्यक्रमाचा सुरूवात करण्यात आली. यावेळी सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, उद्यान विभाग प्रमुख अनिल कोकरे, पालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या अंतर्गत बुद्धा बेली या प्रजातीच्या २ हजार बांबूच्या रोपांची लागवड करण्यात येणार आहे. हरित पनवेल समृद्ध पनवेल बनविण्याच्या दृष्टीने उद्यान विभागाच्यावतीने बांबू रोपणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या कार्यक्रमास उद्यान पर्यवेक्षक विशाल हुडेकर, सहाय्यक उद्यान पर्यवेक्षक महेश घोडसरे, सुमित बोडके यांचे या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले.

## जनतेच्या पाठिंब्याचे ऋण विकास कामांतून फेडणार - आ.दाते

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, पारनेर (अहिल्यानगर) :** रुईछत्रपती येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन आमदार काशिनाथ दाते यांचे शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, विकास ही न थांबणारी आणि निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. मतदारसंघातील प्रत्येक गावात नागरिकांच्या गरजांनुसार विकास कामे व्हावीत, हीच माझी भूमिका आहे. महायुती सरकारच्या माध्यमातून मतदारसंघात कोट्यवधी रुपयांची विकासकामे सुरू आहेत, असे प्रतिपादन पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी केले. रुईछत्रपती गावातील विविध विकासकामांच्या भूमिपूजन प्रसंगी आमदार दाते बोलत होते. या कार्यक्रमात एकूण १० लाख रुपयांचे ग्रामपंचायत कार्यालय बांधकाम, १० लाख रुपयांची स्मशानभूमी विकासकामे तसेच व्यापारी संकुल विस्तारीकरणाचे भूमिपूजन आमदार दाते यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. या कामांमुळे गावातील नागरिकांना प्रशासनिक आणि सामाजिक सोयी-सुविधा उपलब्ध होणार असून गावाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार आहे.

या प्रसंगी भाजपचे मंडलाध्यक्ष राहुल शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, भाजपच्या जिल्हा उपाध्यक्षा अश्विनीताई थोरात, राष्ट्रवादीच्या महिला तालुकाध्यक्षा सुषमाताई रावडे, सागर मैड, दत्तानाना पवार, रांजणगाव सरपंच महेश देशमुख, युवराज पाटील, वाळवणे येथील भैरवनाथ देवस्थानचे विश्वस्त नितीन पठारे, राष्ट्रवादीचे जिल्हा सरचिटणीस नितीन म्हस्के आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात गावातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. स्थानिक ग्रामस्थांनी आमदार दाते यांचे स्वागत करून त्यांच्या माध्यमातून होत असलेल्या विकासकामांबद्दल समाधान व्यक्त केले.



"विधानसभा निवडणुकीच्या काळात अतिशय प्रतिकूल परिस्थितीतही जनतेने माझ्यावर विश्वास दाखवला. या जनतेच्या विश्वासाचे ऋण मी विकासकामांच्या माध्यमातून फेडत राहणार आहे. उद्याच्या काळात आपण सर्वजण मिळून विकासाचा प्रवाह अखंड ठेवणार आहोत. रुईछत्रपती गावात सुरु होणारी ही विकासकामे गावाच्या प्रगतीचा नवा अध्याय ठरणार असून, ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्य ठेवणार.

**- आ.काशिनाथ दाते (विधानसभा सदस्य)**

## आमदार डॉ.देशमुख यांचा हस्ते खापरखेडा परिसरात कोट्यवधींच्या विकासकामांचे भूमिपूजन

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०७, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तालुक्यातील ग्रामपंचायत भानेगाव, चिचोली (खापरखेडा) आणि चनकापूर येथे आमदार डॉ. आशिष देशमुख यांच्या हस्ते कोट्यवधी रुपयांच्या नागरी आणि जनसुविधा योजने अंतर्गत मंजूर विविध कामांचे भूमिपूजन नुकतेच पार पडले. जिल्हा वार्षिक योजनेतून मंजूर झालेल्या या विकास कामांमध्ये प्रामुख्याने सिमेंट रस्ते, अंगणवाडी इमारत बांधकाम आणि स्मशान घाट यांचा समावेश आहे. याशिवाय, आमदार निधीतून डॉ.बाबासाहेब आंबेडकर व प्रशिक्षण केंद्र दुरुस्ती आणि स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छतागृह आदी कामांचे भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी बोलताना आमदार डॉ.आशिष देशमुख यांनी आपला 'विकास हाच एजेंडा' असल्याचे ठामपणे सांगितले. परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही. अशी ग्वाही त्यांनी उपस्थितांना दिली. भूमिपूजन सोहळा कार्यक्रमाला राज्य परिषद सदस्य डॉ. राजीव पोतदार, भाजपा (काटोल) जिल्हाध्यक्ष मनोहर कुंभारे, जेष्ठे नेते रमेश जैन, माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेंद्र शेंडे, सावनेर तालुका



संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष चंद्रशेखर लांडे, रिपाई नेते पृथ्वीराज बोरकर, माजी सरपंच प्रकाश लांजेवार, राहुल बागडे, भानेगाव सरपंच शालिनी चवरे, चिचोली (खापरखेडा) सरपंच मीनाक्षी तागडे, भानेगाव उपसरपंच सोनू बोरकर, चिचोली (खापरखेडा) हेमराज परिहार, माजी जिल्हा परिषद सदस्य अशोक तांदूळकर, राजेश गायकवाड, विलास महल्ले, श्यामराव सरोदे, विपीन नाईक, आशिष फुटाने, निलेश घोडमारे, धीरज देशभ्रतार, चंद्रशेखर पानतावणे, राजेश गायकवाड, नितीन गोस्वामी, रवी फुलझले, राम डाखरे, अनिल छानिकर, सिद्धार्थ बागडे, प्रवीण विवेकर, कुलदीप चवरे, अरुण ठाकरे, अरुण सावरकर, राजू साबळे, विरेंद्र भारद्वाज, संदीप प्रसाद, विश्वजित सिंग, भास्कर वैद्य, डोमाजी निखाडे, योगेश जालंदर, अरविंद चिकनकर, बाळू पाठराबे, कमलेश भास्कर, धीरज नागरकर, किरण शेंडे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, ग्राम पंचायत अधिकारी, कर्मचारी व मोठ्या संख्येने अनेक प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ३ हजार विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत निनादला 'वंदे मातरम'चा सूर



### सामूहिक गायनातून भारत भुमीचा गौरव

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** भारतीय स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा आणि उर्जा देणारे बंकिमचंद्र चट्टोपाध्याय लिखीत 'वंदे मातरम' या गिताच्या रचनेला १५० वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्या अंतर्गत येणारे चंद्रपूर येथील ऋषी अगस्त्य शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि राणी दुर्गावती शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सामूहिक गायन कार्यक्रमात ३ हजार शालेय विद्यार्थ्यांनी 'वंदे मातरम' चा सूर लावून भारत भुमिचा गौरव केला. जिल्हा क्रीडा संकूल येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, प्रमुख वक्तृया प्राचार्य अश्विनी बुजोने, ऋषी अगस्त्य औद्यो. प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य गजानन राजूरकर, राणी दुर्गावती औद्यो. प्रशि. संस्थेच्या प्राचार्य कल्पना खोब्रागडे, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड, सहायक आयुक्त (कौशल्य विकास) अनिसा तडवी, शिक्षणाधिकारी (प्राथ.) अश्विनी सोनवणे, मनिष महाराज आदी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले, 'वंदे मातरम' या गिताच्या रचनेला आज १५० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्या निमित्ताने या सामूहिक गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'वंदे मातरम' या गितामुळे भारतीय स्वातंत्रलढ्याचा आवाज बुलंद झाला आणि स्वातंत्र्यलढ्याला एक नवी दिशा मिळाली. स्वातंत्र्यासाठी ज्यांनी आपले बलिदान दिले त्यांना अभिवादन करून सर्वांनी स्वातंत्र्याच्या मुल्यांचे स्मरण करणे आवश्यक आहे. आपले गाव, शहर, जिल्हा, राज्य आणि देश समृध्द करण्यासाठी आपण सर्व मिळून काम करू या, असे आवाहनही जिल्हाधिकाऱ्यांनी केले. मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह म्हणाले, सन १८७५ मध्ये बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी 'वंदे मातरम' या गिताची रचना केली. या गितामुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्याला एक नवीन प्रेरणा मिळाली. ती प्रेरणा घेऊन आत्मनिर्भरता, एकात्मता आणि अखंडता जोपासण्यासाठी सर्व जण एकत्रित प्रयत्न करू, असे त्यांनी सांगितले. तत्पुर्वी प्राचार्य योगिनी देगमवार यांच्या मार्गदर्शनात उपस्थितांनी एकत्रित 'वंदे मातरम' या गिताचे सामूहिक गायन केले. कार्यक्रमाच्या सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्तृया प्राचार्य अश्विनी बुजोने यांनी 'वंदे मातरम' या गिताचा इतिहास व महत्व विद्यार्थ्यांना सांगितले. कार्यक्रमाचे संचालन पियुष केने यांनी तर आभार बंडोपंत बोढेकर यांनी मानले. कार्यक्रमाला रोशन पाटील, नामदेव राऊत, प्रज्वल गर्गेलवार यांच्यासह मोठ्या संख्येने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील तसेच विविध शाळांचे विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिक उपस्थित होते.

## हवेतील धूलीकण कमी करण्यासाठी नवी मुंबईत डस्ट सप्रेशन व्हेईकल द्वारे प्रभावी कार्यवाही

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०७, नवी मुंबई :** पावसाच्या उघडीपीनंतर रस्त्याच्या कडेला काही प्रमाणात साचलेली माती सुकून हवेतील धुळीचे प्रमाण जरा वाढलेले दिसते. यावर ठोस उपाययोजना करण्याच्या दृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने ब्रश तसेच फ्लीपर मशीन यांच्या सहाय्याने रस्त्यांच्या तसेच पदपथाच्या कडेला साचलेली माती साफ करुन त्या ठिकाणाहून उचलून नेण्यात येत आहे. याकरिता महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार सर्व विभागांत सखोल स्वच्छता मोहीमा राबविण्यात येत आहेत.त्यासोबतच राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमांतर्गत (NCAP) नवी मुंबई महानगरपालिकेकडे असलेल्या ५ अत्याधुनिक डस्ट सप्रेशन व्हेईकलद्वारे हवेतील धुळीचे प्रमाण कमी करण्याची प्रभावी कार्यवाही करण्यात येत आहे. महानगरपालिका क्षेत्रातील ठाणे बेलापूर रोड, आम्र मार्ग, एमआयडीसी क्षेत्रातील मुख्य रस्ते, पामबीच मार्ग अशा वर्दळीच्या रस्त्यांवर या वाहनाद्वारे हवेत पाण्याचे हलके फवारे मारुन हवेतील धूलीकण कमी करण्यात येत आहेत. त्यासोबतच रस्ते व पदपथांच्या कडेलाही पाणी मारुन स्वच्छता करण्यात येत आहे. याकरिता




नवी मुंबई महानगरपालिकेच्या आधुनिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रातील शुध्द केलेले प्रक्रियाकृत पाणी वापरले जात आहे.

या आधुनिक वाहनाद्वारे हवेत पाण्याचे हलके फवारे सोडण्यात येतात, त्यामुळे हवेतील धूळ खाली जमिनीवर बसते व त्याठिकाणी वाहनातील ब्रशींग सिस्टिमद्वारे पाणी मारून सफाई करण्यात येते. त्यासोबतच या वाहनाद्वारे रस्त्याच्या कडेला असलेल्या तसेच दुभाजकांमध्ये असलेल्या झाडांवरही हलके फवारणी करुन त्याठिकाणची धूळ व कार्बनचे कण धुवून घेण्यात येत आहेत.

ही ५ वाहने सकाळी ७ ते ३, दुपारी ३ ते ११ व रात्री ११ ते ७ अशा तीन शिफ्टमध्ये २४ तास चालविली जात असून त्यांनी आपल्या शिफ्टमध्ये कोणत्या रस्त्यावर कार्यवाही करायची याचे विभागनिहाय वेळापत्रक आखून दिलेले आहे व त्यानुसार स्वच्छता करण्यात येत आहे.नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील हवेची शुद्धता चांगली रहावी याकरिता महानगर पालिकेच्या वतीने विविध उपाययोजना केल्या जात असून या ५ डस्ट सप्रेशन व्हेईकलमुळे हवेतील पीएम १० आणि पीएम २.५ हे धुलीकण कमी करण्यास फॉगींगद्वारे मदत होते तसेच रस्ते, पदपथ, दुभाजक यांचीही सफाई केली जाते. या माध्यमातून नवी मुंबईचे पर्यावरण चांगले राखण्यासाठी महापालिका कटीबद्ध राहून काम करीत आहे.

# 'वंदे मातरम' गीताच्या १५० व्या वर्धापनदिनानिमित्त नमुंमपा मुख्यालयात समुहगान

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०७, नवी मुंबई :** दिनांक ०७ नोव्हेंबर २०२५ रोजी 'वंदे मातरम' या गीतास १५० वर्षे पूर्ण होत असल्याने संपूर्ण देशभरात 'वंदे मातरम' गीताचे सामुहिक गायन करण्याचे केंद्र सरकारच्या संस्कृती मंत्रालयामार्फत तसेच महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत सूचित करण्यात आलेले आहे. त्यास अनुसरुन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगर पालिका मुख्यालयातील ॲम्फिथिएटर येथे सकाळी १० वाजता 'वंदे मातरम' गीताचे सामुहिक गायन म ोठया उत्साहात संपन्न झाले. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत सर्व शाळा व महाविद्यालयांमध्येही 'वंदे मातरम' गीताचे सामूहिक गायन करण्याच्या निर्गमित करण्यात आलेल्या




सूचनांप्रमाणे समुहगान करण्यात आले. नवी दिल्ली येथे पंतप्रधान महोदय यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या 'वंदे मातरम' या विशेष कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपणही महापालिका मुख्यालयात ॲम्फिथिएटर मधील मोठ्या एलईडी स्क्रिनवर प्रक्षेपित करण्यात आले.बंकिमचंद्र चटोपाध्याय यांच्या 'आनंदमठ' कादंबरीत असलेले 'वंदे मातरम' हे गीत ०७ नोव्हेंबर १८७५ रोजी अक्षय नवमीच्या दिवशी लिहिले गेले असे मानले जात असून स्वातंत्र्य चळवळीपासून आजतागायत ते प्रत्येक भारतीयाचा उद्धोष झाले आहे. १८९६ मध्ये गुरुदेव रविंद्रनाथ टागोर यांनी प्रथमत: 'वंदे मातरम' गायले व पुढे ते स्वातंत्र्यसैनिकांचे प्रेरणा गीत बनले. आझाद हिंद सेनेच्या घोषणा प्रसंगी 'वंदे मातरम' गायले गेले. १९०५ मध्ये बंगालच्या फाळणीविरुध्द निषेधाचा 'वंदे मातरम' हा मंत्र होता. १९०७ मध्ये भिकाजी कामा यांनी भारताबाहेर प्रथमच बर्लिन येथे तिरंगा ध्वज फडकावला त्यावर 'वंदे मातरम' हे शब्द लिहले होते.

२४ जानेवारी १९५० रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी संविधान सभेत वंदे मातरमला राष्ट्रगीताप्रमाणेच दर्जा आहे हे प्रस्थापित केले. अशाप्रकारे 'वंदे मातरम' हा प्रत्येक भारतीयाचा अंत:स्वर झाला.या अनुषंगाने केंद्र व राज्य सरकारच्या निर्देशानुसार ७ नोव्हेंबर २०२५ रोजी 'वंदे मातरम' गीताचा १५० वा वर्धापनदिन साजरा होत असताना महापालिका मुख्यालयात ॲम्फिथिएटर येथे 'वंदे मातरम' गीताचे समुहगान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्यासह विविध विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारीवृंद तसेच डीपीएस स्कुल, नेरुळ व एसएस स्कुल, नेरुळ या शाळांचे स्काऊट गाईड विद्यार्थी व शिक्षक मोठया संख्येने उपस्थित होते. भारतीय जनमानसात दे शाविषयीचे प्रेम व देश भावना जागृत होण्यासाठी महत्वाची भूमिका बजावणाऱ्या 'वंदे मातरम' या गीताच्या समूह गायनातून राष्ट्रप्रेमाचे भरलेले वातावरण निर्माण झाले होते.

# DYFI ठाणे, पालघर जिल्हा अधिवेशन मोठ्या उत्साहात संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, तलासरी (पालघर) :** आज दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ रोजी, कॉ. गोदावरी शामराव परुळेकर भवन तलासरी, येथे DYFI ठाणे पालघर जिल्हा अधिवेशन पार पडले. सदर अधिवेशनास जिल्हयातून जवळपास २५० प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता. सर्व प्रथम राज्याध्यक्ष कॉ.नंदकुमार हाडल यांच्या हस्ते DYFI चा ध्वज फडकविण्यात आला, त्यानंतर सर्व प्रतिनिधींनी हुतात्मा स्मारकास फुले वाहिली व अधिवेशनास सुरवात झाली. अध्यक्ष मंडळाची जबाबदारी कॉ.सुरेश भोये कॉ.सपना बेंदर यांनी पार पाडली. अध्यक्ष मंडळानी सुरवातीला शोक प्रस्ताव ठेवला. उद्घाटनाच भाषण म ार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव कॉ. किरण गहला यांनी केलं. किसान सभेचे नेते व माजी DYFI केंद्रीय कमिटी सदस्य कॉ नरेश शिंगडे यांनी किसान सभेच्या वतीने शुभेच्छा दिल्या.

भास्कर म्हसे यांनी डऋख च्या वतीने शुभेच्छा दिल्या तर सुनीता शिंगाडा यांनी जनवादी महिला संघटनेच्या वतीने शुभेच्छा दिल्या. त्यानंतर कॉ. गोदावरी शामराव परुळेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी ए राजपूत सर



यांनी मार्गदर्शन केले.

त्यानंतर ध्ऋख जिल्हा सचिव कॉ. राजेश दळवी यांनी मागील तीन वर्षाच्या कार्याचा अहवाल मांडला.

ह्या अहवालावर चर्चा करून १२ प्रतिनिधींनी अहवालवर चर्चा करून आपलं मत मांडलं व अहवालाला अनुमोदन दिलं, अहवालावर उपस्थिती केलेल्या प्रश्नांची कॉ. राजेश दळवी यांनी उत्तर दिलं.

ठाणे पालघर जिल्हा प्रभारी कॉ. संजीव सामनतुल यांनी मार्गदर्शन केले व नवीन जिल्हा कमिटी ही ३७ सदस्यांची असेल असा प्रस्ताव आधीवेशनासमोर ठेवला तो एक मताने मंजूर झाला त्यानंतर नवीन जिल्हा कमिटी मधील सदस्यांची नावे अधिवेशनात ठेवण्यात आले. नवीन जिल्हा कमिटी एक मताने मंजूर करण्यात आली. त्यानंतर नवीन जिल्हा कमिटी मध्ये चर्चा करून पदाधिकारी निवडण्यात आले. DYFI जिल्हा अध्यक्ष कॉ.नंदकुमार हाडल, DYFI जिल्हा सचिव कॉ. राजेश दळवी, DYFI जिल्हा खजिनदार कॉ. सुरेश भोये यांची एक मताने निवड करण्यात आली. तसेच तलासरी तालुक्यामधून जिल्हा कमिटी मध्ये कॉ.अनिल झिरवा, कॉ.सुहास सुरती, कॉ.शंकर खेवरा, कॉ.जिग्नेश मोर, कॉ. अक्षय दवनेकर, कॉ.शरद उंबरसाडा यांची निवड करण्यात आली.

त्यानंतरच्या जिल्हा कमिटी मधून निवृत झालेल्या सदस्यांपैकी कॉ.दत्ता भोंडवा व कॉ.विलास गहला यांनी आपले मनोगत व्यक्त केले. नवनिर्वाचित सचिव कॉ राजेश दळवी यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर पक्षाचे केंद्रीय कमिटी सदस्यव डहाणू विधानसभा आमदार कॉ. विनोद निकोले यांचं समारोपाचे भाषण झालं. जिल्हा व राज्याध्यक्ष कॉ नंदकुमार हाडल यांनी सर्वांचे आभार मानून आभार प्रदर्शनाचा कार्यक्रम पार पडला. शेवटी जोरदार घोषणांनी अधिवेशनाची सांगता झाली.

# बाबाजी पाटीलांच्या संकल्पनेतून बी.के फौंडेशन यांच्या सौजन्याने आजी-आजोबा स्नेहसंमेलन, मानसन्मान २०२५ चे आयोजन

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०७, देसाई गाव (ठाणे) :** परम पूज्य स्वामी डी.के.दास महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व बाबाजी पाटील यांच्या वडिलांच्या प्रेरणेने स्वर्गीय बाळाराम का.पाटील यांच्या प्रेरणेने वार मंगळवार दिनांक ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता बी.के.वाटर पार्क- हॉटेल, कोकण किंग लॉन्स येथे आजी-आजोबांचं आदर्श सत्कार व त्यासोबत संगीतमय वाद्यवृंदासह स्नेह-भोजन कार्यक्रमाचे आयोजन बाबाजी पाटील यांच्या संकल्पनेतून व बी.के फाउंडेशन यांच्या सौजन्याने आयोजन केले आहे.

प्रभागातील सर्व आजी-आजोबांनी सदर कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. अशी विनंती बी.के फाउंडेशनचे संस्थापक, दि. ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक चे संचालक बाबाजी पाटील यांनी केली आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे, दिवा शहर प्रमुख: रमाकांत मढवी, देसाई गावचे अध्यक्ष: बाळाराम म्हात्रे, ठाणे जिल्हा महिला संघटक कळवा




- मुंब्रा लता पाटील या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभणार आहेत.

कुटुंब म्हटल की, डोळ्यांसमोर येथे ती घरात वावरणारे जेष्ठ मंडळी, ज्येष्ठ म्हटले की दिसतात ते आजी-आजोबा कुटुंब एकत्र ठेवायचा किंवा कुटुंबातील शिस्त ढासळू नये याची खबरदारी घेणारे ही दोन व्यक्तिमत्व म्हणजे आजी- आजोबा. त्या माणसाचा दारारा जेवढा जास्त तेवढी भीती सुद्धा असते. आदरयुक्त भीती आयुष्यभर काबाडकष्ट करून, घर संसार, शेतीवाडी याची जपणूक केली.स्वतः च्या पोटाला चिमटा काढत कुटुंबासाठी जीव ओतला त्या आजी-आजोबांना प्रत्येक गोष्टीची काळजी असते. हे सारं जपता - जपता कुटुंबातली एकी कायम राहावी यासाठी जीव तळमळत राहतो. या सर्व भूमिका पार पडता - पडता ही माणसं वयस्कर होतात. बहुतेकदा दु:ख पचवून घेण्यासाठी स्वतःला खोटं ठरवतात स्वतःचा आत्मविश्वास पणाला लावतात.आई-वडिलांनी रागावून चार फटके दिलेल्या नातवंडाला आधार वाटतो तो आजी-आजोबांचा. धावत जाऊन त्याच्या कुशीत शिरावं आणि आपण पूर्ण सुरक्षित असल्याचा आई-वडिलांना कळावं. एवढी शक्ती या प्रेमामध्ये आहे कारण आजी-आजोबांकडे असलेल्याला हात लावण्याची हिंमत कोणाचीच नाही. अशाच या आजी-आजोबांचे स्नेहसंम ेलन २०२५ चे बाबाजी पाटील यांच्या कुटुंबांनी, बी.के फाउंडेशन ने स्नेहसंम ेलन आयोजित केला आहे. तसेच देसाई -शिळ,दिवा विभागातील अनेक आजी - आजोबांनी उपस्थित राहुल या कार्यक्रमाची शोभा वाढवावी. त्यांचे नाती - गोती, मित्र, सगे- सोयरे, असून सुद्धा कधी एकत्र येण्याचा योग येत नाही परंतु पाटील कुटुंबांनी आपल्या परिसरातील आजी-आजोबांना एकत्र आणून त्यांच्या आठवणीला उजाळा व त्यांचा मानसन्मान करण्याचे ठरवले आहे. व सहसंमेलन भोजन करण्याचे ठरविले आहे. तरी या परिसरातील आजी - आजोबांनी मोठ्या संख्येने उपस्थितीत राहावे अशी विनंती दि. ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँके संचालक, बी.के फाउंडेशन चे संस्थापक बाबाजी पाटील यांनी केली आहे.

हा कार्यक्रम व्यवस्थित रित्या पार पडण्यासाठी दिवस-रात्र मेहनत घेत आहेत आनंदीबाई पाटील, बाबाजी पाटील, सुनिता पाटील, धनाजी पाटील, जयश्री पाटील, ज्ञानेश्वर पाटील, सविता पाटील, आकाश पाटील, चिन्मयी पाटील, रोहित पाटील,अंकिता पाटील, शुभम पाटील, सायली पाटील, सौरभ पाटील, सूयोग पाटील व बी.के फाउंडेशनचे सर्व सभासद कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मेहनत घेत आहेत.

# पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांचा पालम शहरात नागरी सत्कार संपन्न

**अक्षराज : बाळासाहेब फुलपगार**

**दि.०७, पालम (परभणी) :** शुक्रवार, दिनांक ०७ नोव्हेंबर २०२५ रोजी पालम तहसील कार्यालयासमोर राज्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांचा पालम तालुका भाजपा पक्षाच्यावतीने भव्य नागरी सत्कार आयोजित करण्यात आला. भाजपचे ज्येष्ठ नेतेगणेशराव रोकडे यांच्या वतीने हा भव्य नागरी सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी मुख्य चौकात जेसीबी तुन फुलांची उधळण करत, सभा स्थळापर्यंत

मिरवणूक काढण्यात आली. यावेळी नागरी सत्कारासोबतच जनसंवाद मेळावा संपन्न झाला. या कार्यक्रमाला भाजपाचे ज्येष्ठ नेते सुरेशराव वरपुडकर, डॉ.खटिंग, संतोषराव मुरकुटे, सुभाष कदम, भरत घनदाट, विठ्ठलराव रबदाडे, प्रेरणाताई वरपुडकर, लक्ष्मणराव रोकडे, लिंबाजी टोले, माऊली जाधव, भाजपा जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे यांच्यासहपरभणी जिल्ह्यातील



भाजपचे सर्व प्रमुख नेते, पदाधिकारी तसेच पालम शहरासह तालुक्यातील भाजपचे सर्व नेते व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी पोलीस निरीक्षक शेषराव खटाने यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

## थोडक्यात

# महाराष्ट्र विद्यालयाचे ज्युदोपटू राज्यस्तरावर

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.०७, नागपूर :** नुकत्याच विभागीय क्रीड़ा संकुल मनकापुर चौक नागपूर येथे संपन्न झालेल्या विभागीय शालेय ज्युदो स्पर्धेत महाराष्ट्र विद्यालयाच्या ज्युदोपटूंनी उल्लेखनीय कामगिरी करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली. १४ वर्षा खालील वयोगटात मुलीमध्ये ४४ किलो वर उन्नती भोसकर प्रथम, १९ वर्षा खालील मुलीमध्ये ३६ किलो खाली रिधिमा सुधाकर वासनिक प्रथम तर १९ वर्षा खालील मुलामध्ये ५५ किलो खाली प्रांजल दिलीप बर्वे याने प्रथम क्रमांक प्राप्त केल प्रथम क्रमांक प्राप्त करणारे उन्नती भोसकर, रिधिमा वासनिक व प्रांजल बर्वे हे ज्युदोपटू मनमाड येथे होणाऱ्या शालेय राज्यस्तरीय ज्युदो स्पर्धेकरिता नागपूर विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. माजी मंत्री व महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेचे सुनीलबाबू केदार, सचिव सुहासकेदार, सुधिरकेदार व संस्थेचे सर्व पदाधिकारी, विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण वडस्कर, उपमुख्याध्यापक चंद्रशेखर लिखार, प्रा.विजय टेकाडे, क्रीडा शिक्षक धर्मेंद्र सुर्यवंशी, धैर्यशील सुटे व सर्व शिक्षक व कर्मचारी वर्गाने खेळाडूंचे अभिनंदन केले.

# अंबाजोगाई शहरात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ला खिंडार

**अक्षराज : शिवाजी औसेकर**



**दि.०७, अंबाजोगाई (केज) :** केज विधानसभेचे लोकप्रिय आमदार नमिता अक्षय मुंदडा यांच्या कार्याने प्रेरित होऊन आणि अक्षय भैय्या मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली, नंदकिशोर (काकाजी) मुंदडा यांच्या उपस्थितीत अंबाजोगाई नगरपालिकेचे माजी नगरसेवक शमीम काझी यांनी दिनांक ०७ नोव्हेंबर २०२५ रोजी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. या प्रवेशामुळे अंबाजोगाई शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ला मोठे राजकीय खिंडार पडल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. या प्रसंगी बोलताना शमीम काझी म्हणाले, मी भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेवर पूर्ण विश्वास ठेवतो. येत्या काळात अंबाजोगाई शहरात भाजपचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी आणि पक्ष संघटन अधिक बळकट करण्यासाठी प्रयत्नशील राहीन. या कार्यक्रमाला अनेक भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विधवा महिलेला धमकावून खंडणी उकळणाऱ्या खंडणीखोर पत्रकारांच्या टोळीला अटक



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** पत्रकार असल्याचा धाक दाखवून असहाय विधवा म हिलेकडून १ लाखाची खंडणी वसूल करणाऱ्या पत्रकाराच्या टोळीला रामनगर वोलिसांनी अटक केली. दिनांक ०५ नोव्हेंबरला ५ - ६ व्यक्ती शहरातील एका असहाय विधवा महिलेच्या घरी गेले. ती अवैध काम करीत असून त्याबाबत तिची बातमी प्रसिध्द करण्यासाठी तिच्याकडून १ लाख रुपयाची मागणी या बोगस पत्रकारांनी केली. तसेच पैसे न दिल्यास तिला ठार करण्याची धमकी देऊन तिच्याकडून जबरदस्तीने १ लाख रुपये खंडणी घेतली. याहाहतची तक्रार त्या महिलेने रामनगर पोलीस ठाण्यात केली. तक्रारीवरुन पोलिसांनी गुन्हा दाखल केला. या गुन्ह्याच्या तपासादरम्यान पोलिसांनी पत्रकारांबाबत माहिती काढली असता, ते शहरातील वेगवेगळ्या दैनिक वर्तमानपत्र, वेबपोर्टल न्यूज व न्यूज टीव्ही चॅनलचे संपादक, जिल्हा प्रतिनिधी व तालुका प्रतिनिधी असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यांना ताब्यात घेण्यात आले.

सत्यशोधक न्युज, चंद्रपूर (वेबपोर्टल) मुख्य संपादक राजु नामदेव शंभरकर, वय ५७ वर्ष, लालपेठ कॉलरी नं. १ चंद्रपूर, इंडिया २४ न्यूज, चंद्रपूर (वेबपोर्टल) चंद्रपूर जिल्हा प्रतिनिधी कुणाल यशवंत गर्गेलवार, वय ३७ वर्ष, रा. विठ्ठल मंदीर वार्ड मथुरा चौक, चंद्रपूर, दैनिक विदर्भ कल्याण, उमरेड नागपूर (दैनिक न्यूज पेपर) चंद्रपूर तालुका प्रतिनिधी अविनाश मनोहर मडावी, वय ३३ वर्ष, रा. इंदिरानगर मुल रोड, चंद्रपूर, भारत टी.व्ही. न्यूज, आग्रा (टी.व्ही. चॅनल) चंद्रपूर जिल्हा प्रतिनिधी राजेश नारायण निकम वय ५६ वर्ष रा. जमनजेट्टी पाटील वाडी, लालपेठ वार्ड चंद्रपूर या आरोपींना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता, त्यांनी या गुन्ह्याची कबुली दिली. या गुन्ह्यातील आरोपींचे आणखी दोन साथीदार असल्याचे निष्पन्न झाले असून, त्यांचाही पोलीस शोध घेत आहे.

सदरची कारवाई मुमक्का सुदर्शन पोलीस अधीक्षक चंद्रपूर, ईश्वर कातकडे अपर पोलीस अधिक्षक चंद्रपूर, प्रमोद चौगुले उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपूर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक आसिफ राजा शेख यांच्या नेतृत्वात सपोनि देवाजी नरोटे, निलेश वाघमारे, हनुमान उगले, पो.अं. जितेंद्र आकरे, शरद कुडे, आनंद खरात, लालु यादव, बाबा नैताम, मनिषा मोरे, रविकुमार ढेंगळे, पंकज ठोंबरे, प्रफुल्ल पुप्लवार, संदिप कामडी, सुरेश कोरवार, रुपेश घोरपडे व ब्ल्युटी साखरे यांनी केली आहे. जिल्हयात कोणासही कोणीही पत्रकार अथवा पोलीस असल्याची बतावणी करुन अशा प्रकारचे फसवणुक करुन लुटमार केली असेल किंवा खंडणी मागत असेल तर त्यांनी तात्काळ नजिकच्या पोलीस स्टेशनला किंवा डायल ११२ वर संपर्क करुन माहिती दयावी, असे आवाहन पोलीस प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.